महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१

www.dvet.gov.in ;desk८@dvet.gov.in ;०२२-२२६२०६०४/२९३

क्रमांक २/आस्था२/स्कॅनिंग दरपत्रक/२०२५/७८७ दिनांक :- १५/०९/२०२५

प्रति,

इच्छुक पुरवठादार
ई- एचआरएमएस प्रणालीसाठी सेवा- पुस्तक
व गोपनिय अहवाल स्कॅनिंग सेवेसाठी

विषयः-

ई एचआरएमएस ( ELECTRONIC Human Resources Management Service System) प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी संचालनालयात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तके व गोपनिय अहवालांचे डिजीटायझेशन करणेकरीता स्कॅनिंग सेवा घेण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे.

१) दरपत्रक सादर करण्याची मुदतीचा अंतिम दिनांक :- दि. 22/ 09 /२०२५ साय. ६.१५ वाजेपर्यंत प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्यात येतील.

२) दरपत्रक उघडण्याचा दिनांक :- दि. 23/ 09/२०२५

३) दरपत्रक उघडण्याचे ठिकाण :- मा. सहसंचालकाचे दालन, चौथ मजला, मुख्य इमारत, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रशिक्षण संचालनालय मुंबई.

दरपत्रकांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | सेवेचा तपशिल | अंदाजित पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | संचालनालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा पुस्तकांचे व गोपनिय अहवालांचे स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणे | ३०,००० ते ४०,००० |

अ) <u>हार्डवेअर</u>

१. उच्च क्षमतेचे टेबलटॉप बुक स्कॅन ( A३ आकारासाठी सक्षम )
२. ६०० DPI चे कमीत कमी ऑप्टीकल रेझोल्युशन
३. कमीत कमी १GB बफर मेमरी
४. CMOS/CCD सेन्सर
५. किंवा वरील पेक्षा अधिक चांगली क्षमता असलेले स्कॅनर



Scanned with OKEN Scanner

ब ) सॉफ्टवेअर

१. दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली ( Documentation Management System )
२. OCR ( Optical Character Recognition ) सुविधा
३. मेटाडेटा व्यवस्थापन ( १० ते २० ) , फाईल ट्रॅकींग व वर्जन कंट्रोल
४. युजर एक्सेस कंट्रोल, सर्च रिपोर्टीग सुविधा
५. वेब /डेस्कटॉप - आधारित इंटरफेस

क ) मनुष्यबळ

१. स्कॅनिंग ऑपरेटर स्कॅनिंग व दस्तऐवज व्यवरथापनासाठी.
२. डेटा एन्ट्री ऑपरेटर- मेटाडेटा भरणे , वर्गीकरण.
३. सुपर वायझर कामाचे समन्वय व गुणवत्ता नियंत्रण.
४. सर्व मनुष्यबळास नाजुक कागदपत्रे हाताळण्याबाबत व डिजीटायझेशन उत्कृष्ट पद्धतीने पालन करण्यास आवश्यक प्रशिक्षण दिलेले असावी.
५. कामाचे तास व मनुष्यबळाची संख्या विभागाच्या गरजांनुसार सुसंगत असावी . संवेदनशील माहीतीचे संरक्षण करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी गोपनियतेचे करार ( Confidential Agrements स्वाक्षरीत केलेले असावे )

अटी व शर्ती

१) दरपत्रके सोबतच्या नमुन्यात मध्येच दरपत्रक सादर करावीत. स्वत:च नमुना वापरु नये. मात्र स्वत:च्या कार्यालयीन लेटरहेडसह या कार्यालयाने दिलेला विहित नमुना सादर करता येईल. तसेच दरपत्रके ई-मेल द्वारे सादर करु नयेत.
२) तांत्रिक लिफाफा, अतांत्रिक लिफाफा ( व्यापारी लिफाफा ) दोन स्वतंत्र लिफाफे ( लिफाफ्यावर नाव नमुद करावे ) तिसऱ्या लिफाफ्यात सादर करावे.
३) दरपत्रकाच्या किंमती व अन्य संदर्भात वैधता कालावधी स्पष्टपणे नमुद केला पाहिजे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासुन १ एक वर्षापर्यंतचे असावे.
४) काम समाधानकारकरित्या पुर्ण केल्यानंतरचे देयके अदा केली जातील.
५) सदर दर पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकापासुन १ वर्ष कंत्राट कालावधीमध्ये संबधित पुरवठादारास बंधनकारक असतील. सदर १ वर्षाच्या कालावधीत पुरवठादाराचे काम समाधानकारक असल्यास आवश्यकतेप्रमाणे कंत्राट वाढविण्याचा विचार करण्यात येईल.
६) सेवा पुरवठादाराने प्रत्यक्ष स्थळभेट ( Site Survey ) घेवुन तपशिलवार अंमलबजावणी आराखडा ( Deployment Plan) सादर करावा.
७) स्कॅनिंग प्रकीया ही कागदपत्रांची कोणतीही हानी न करणारी असावी व सेवापुस्तकांची व गोपनिय अहवालांची अखंडता जपणारी असावी.
८) स्कॅन केलेल्या सर्व माहितीचे पुर्ण स्वामित्व ( Oewenership) विभागाकडेच राहील.



Scanned with OKEN Scanner

८) स्कॅन केलेल्या सर्व माहितीचे पुर्ण स्वामित्व ( Oewenership) विभागाकडेच राहील.

९) संपुर्ण प्रकीये दरम्यान माहितीची सुरक्षा व गोपनियता सेवापुरवठादाराने सुनिश्चित करावी.

१०) सर्व उपकरणांची स्थापना , चाचणी व कार्यान्वयन सेवापुरवठादारानेच करावे.

११) तात्रिक बाबींचा लिफाफा :-

- सेवा पुरवठादारांचे फर्मचे नाव , पुर्ण नाव, पुर्ण पत्ता ई-मेन संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक
- संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.
- जीएसटी नोंदणी क्रमांक
- पॅन क्रमांक
- मुळ उत्पादक कंपनीचे प्राधिकारपत्र ( असल्यास)
- यापुर्वी शासकीय /निमशासकीय कार्यालयातील सेवा विषयक कामाचा अनुभव /याबाबतची कागदपत्रे/प्रमाणपत्रे ( कार्य आदेश प्रती ) /काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र
- यापुर्वी कोणत्याही शासकीय /निमशासकीय आस्थापनेने काळ्या यादीत टाकले नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

१) अंतांत्रिक लिफाफा ( व्यापारी दरांचा लिफाफा ) :- प्रती पान स्कॅनिंग व अनुषांगिक बाबींचा दर नमुद करुन सिलंबद लिफाफा सादर करण्यात यावा.

१२) कोणतेही कारण न देता एक किंवा अनेक निविदा नाकारण्याचे हक्क हे कार्यालय राखुन ठेवित आहे.

माधवी सरदेशमुख ( भा.प्र.से )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचलनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई -१

Scanned with OKEN Scanner